मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » मंगळवार, दि. 30 जुलै 2024 | पान- 1

# दर्जेदार शिक्षण देण्यास महापालिका कटीबद्ध : शेखर सिंह

## शालेय साहित्य वितरणासाठी ई-रुपी प्रणालीचा अवलंब : पिंपरी चिंचवड महापालिकेचा नाविन्यपूर्ण उपक्रम

**पिंपरी | प्रतिनिधी**

सर्व शैक्षणिक सुविधांसह दर्जेदार शिक्षण देण्यासाठी महापालिका कटीबद्ध असून विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधांचा परिपूर्ण लाभ मिळावा आणि शालेय साहित्याचे थेट लाभ हस्तांतरण पद्दतीने वितरण करण्यासाठी ई-रुपी कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. त्यानुसार येत्या १० दिवसात महापालिकेच्या शाळेत शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण करण्यात येणार असल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिली.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना दरवर्षी शालेय साहित्याचे वाटप महापालिकेच्या वतीने करण्यात येते. त्यासाठी थेट लाभ हस्तांतरण पद्धतीचा अवलंब करण्यात येते. सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात शालेय साहित्याचे वाटप करण्यासाठी थेट लाभ हस्तांतरण पद्धती अंतर्गत ई-रुपी कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

या कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, शिक्षण विभागाचे सहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात, प्रशासन अधिकारी संगीता बांगर, मुख्याध्यापक रविंद्र शिंदे, वैशाली बागलाने, जनसंपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, शिक्षिका मालन वीर, स्वाती घोडके, मनीषा येणारे, रु यांच्यासह विद्यार्थ्यांचे पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### शालेय साहित्यात कोणत्या वस्तूंचा समावेश आहे?

» महापालिकेच्या वतीने देण्यात येणाऱ्या शालेय साहित्यामध्ये दप्तर, बुट, सॉक्स, पी.टी बुट,कंपास पेटी, फुट पट्टी, वह्या, स्वाध्यायमाला, प्रात्याक्षिक पुस्तिका, चित्रकला वही, नकाशा पुस्तिका, रेनकोट, स्टीलची पाण्याची बॉटल आदी साहित्यांचा समावेश आहे. तसेच महापालिकेने निश्चित केल्या प्रमाणे साहित्याचे वितरण व्हावे, याबाबत शालेय स्तरावर सर्व मुख्याध्यापक आणि शिक्षकांनी दक्षता घ्यावी,अशा सूचना आयुक्त सिंह यांनी केल्या.

### कशी आहे ई-रुपी प्रणाली?

» थेट लाभ हस्तांतरण ई-रुपी पद्धती अंतर्गत शालेय साहित्याच्या वितरणासाठी पालकांद्वारे विद्यार्थ्याच्या संबंधित शाळेमध्ये अद्ययावत मोबाईल क्रमांकाची नोंदणी करण्यात आली आहे. बँकेमार्फत या मोबाईल क्रमांकावर क़्यूआर कोड संबंधित लिंक असलेला संदेश पाठविण्यात येतो. या लिंकद्वारे मोबाईलमध्ये क़्यूआर कोड जनरेट करण्यात येतो. पालकांनी हा क़्यूआर कोड महापालिकेने निश्चित केलेल्या पुरवठादाराकडे सादर करायचा आहे. शालेय साहित्य पुरवठादाराकडून क़्यूआर कोड स्कॅन केल्यानंतर पालकांच्या मोबाईल क्रमांकवर ओटीपी जातो. हा ओटीपी पालकांनी पुरवठादारास सादर केल्यानंतरच विद्यार्थ्यांना शालेय साहित्य मिळते.

“ शालेय साहित्याचे वितरण करण्यासाठी महापालिकेने अवलंबविलेल्या नवीन प्रणालीत भविष्यात येणाऱ्या त्रुटी दूर करून पुढील शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच विद्यार्थ्यांना सर्व साहित्याचे वितरण करण्यात येणार आहे.

- शेखर सिंह, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

# शिवसेना विभाग रुपीनगर आयोजित रक्तदान शिबिरास शिवसैनिकांचा उस्फुर्त प्रतिसाद

## पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त विधायक उपक्रम, 'संपूर्ण शिवसेना पक्ष साहेबांच्या पाठीशी कायम खंबीरपणे उभा': संतोष सौंदणकर

**पिंपरी | प्रतिनिधी**

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या ६४ व्या वाढदिवसानिमित्त रविवारी (दि. २८) रोजी रुपीनगर येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. दीडशेपेक्षा अधिक जणांनी रक्तदान शिबिरात सहभाग नोंदवला होता. भोसरी विधानसभा संपर्कप्रमुख केसरीनाथ पाटील, जिल्हा संघटिका सुलभाताई उबाळे, विधानसभा प्रमुख धनंजय अल्हाट यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना विभाग रुपीनगरच्या वतीने हे रक्तदान शिबिर पार पडले.

रक्तदान शिबिराचे उद्घाटन ज्येष्ठ नागरिक संघाचे कार्याध्यक्ष पतंगे सर व त्यांचे सहकारी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शिवसेनेचे जेष्ठ मार्गदर्शक अशोक वाळके, कैलास नेवासकर, जिल्हाप्रमुख निलेश मुटके, चिंचवड विधानसभा संघटक संतोष सौंदणकर, विभाग प्रमुख संदीप भालके, आरोग्य सेनेचे जिल्हाप्रमुख सुखदेव आप्पा नरळे, जिल्हा संघटक रावसाहेब थोरात, युवराज कोकाटे, नेताजी काशीद, राहुल गवळी, सचिन सानप, महिला विधानसभा प्रमुख कल्पना शेटे, महाविकास आघाडीचे माजी नगरसेवक पंकज भालेकर, प्रवीण भालेकर, रवींद्र सोनवणे, संगीता ताम्हाणे, धनंजय भालेकर, विलास भालेकर, शांताराम भालेकर, राहुल पवार, बिराजदार, बाप्पा जाधव, रमेश पाटोळे, बाळासाहेब सारंगधर आदी उपस्थित होते

कार्यक्रमाचे आयोजन भोसरी विधानसभा संघटक दादासाहेब नरळे, शिवसेना विभाग प्रमुख नितीन बोंडे, शिवसेना विभाग संघटिका आशा भालेकर, शिवसेना संघटक सुजाताई काटे, उपविभाग प्रमुख गणेश भिंगारे, पांडुरंग कदम, नागेश आजुरे, आतिश जाधवम, शाखाप्रमुख मोहन जाधव, सर्जेराव कचरे, सहदेव चव्हाण, अभिमन्यू सोनसळे, दीपक कदम, सुनील बाठे, सतीश कंठाळे, सुजित साळवी, उपशाखाप्रमुख कैलास तोडकर, बाळासाहेब वारे, युवा सेना संघटक सुनील समगिर, अमित शिंदे, प्रवीण पाटील, अमोल भालेकर, सागर चव्हाण आदींनी केले.शिवसेना विभाग प्रमुख नितीन बोंडे यांनी आभार मानले.



### सर्वच शिवसैनिक मतभेद विसरून एकत्र आले

» शाखाप्रमुख सर्जेराव कचरे म्हणाले, 'रक्त तयार केले जाऊ शकत नाही, ते फक्त उदार रक्तदात्यांकडूनच येऊ शकते. या उदात्त कार्यासाठी आज सर्वच शिवसैनिक मतभेद विसरून एकत्र आले. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर रक्तसाठा निर्माण झाला. रक्तदात्यास आकर्षक भेटवस्तुही यावेळी देण्यात आल्या. रक्तदान शिबिरासाठी तज्ञ डॉक्टर, परिचारिका, पॅरामेडिक्स आणि इतर कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षम टीमची साथ लाभली.

### शिवसेना पक्ष साहेबांच्या पाठीशी कायम खंबीरपणे उभा

» संतोष सौंदणकर म्हणाले, "शिवसेनाप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याकडे सबंध महाराष्ट्र हा लोककारणाचा मंत्र जपणारं नेतृत्व म्हणून पाहत आहे. मुख्यमंत्री असताना त्यांच्या जनताभिमुख राजकारणामुळे जनकल्याणाच्या अनेक योजना शेवटच्या लोकांपर्यंत पोहोचल्या. त्यामुळेच लोकसभेला उद्धव साहेबांचा करिश्मा सर्वांना दिसला. विरोधात असताना देखील लोकाभिमुख निर्णयासाठी सत्ताधारी नेतृत्वाला नडायाची सर्वाधिक ताकद आज केवळ आमच्या उद्धव साहेबांमध्ये आहे. जनतेचा विश्वास आणि जनतेचे कल्याण या धोरणामुळेच राज्यभरातून कार्यकर्त्यांचा ओघ आज शिवसेनेत वाढत आहे. हे यश कायम टिकून राहिल यासाठी संपूर्ण शिवसेना पक्ष साहेबांच्या पाठीशी कायम खंबीरपणे उभा आहे आणि राहील, अशी ग्वाही एक शिवसैनिक म्हणून आम्ही देत आहोत.

# सावधान 'स्वाईन फ्लू' परततोय...

## झिका, चंडीपुरानंतर राज्याला आणखी एक धास्ती, स्वाईन फ्लूचा नवा व्हेरियंट अधिक धोकादायक असल्याचे सिद्ध

**पुणे | प्रतिनिधी**

सध्या अनेक साथीच्या रोगांनी थैमान घातले असतानाच आता आणखी एक धक्कादायक बाब समोर येत आहे, ती म्हणजे, स्वाईन फ्लू परतण्याची. स्वाईन फ्लू हद्दपार झाला आहे असे वाटत असतानाच तज्ज्ञांनी नव्या व्हेरियंटसह स्वाईन फ्लूचा उद्रेक होण्याचा दावा केला आहे.

राज्यात अनेक ठिकाणी झिका, चंडीपुराचे रुग्ण आढळत असतानाच स्वाईन फ्लूचा नवा व्हेरियंट अधिक धोकादायक असल्याचे समोर आले आहे. राज्याच्या संसर्गजन्य रोग विभागाने या वर्षी जुलैपर्यंत स्वाईन फ्लूमुळे सुमारे १८ मृत्यूची नोंद केली असून सुमारे ६० रुग्णांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या प्रादुर्भावाबाबत राज्याच्या आरोग्य विभागाच्या संसर्गजन्य रोग विभागाचे प्रमुख डॉ. आर. बी. सुळे यांनी दुजोरा दिला आहे. ते म्हणाले, “स्वाईन फ्लूच्या रुग्णांची मोठ्या प्रमाणात वाढ होण्यात सुरुवात झाली आहे.” मात्र, बाधित जिल्ह्यांची संख्या त्यांच्याकडे उपलब्ध नव्हती. याबाबत माहिती घेऊन कळवतो, असे त्यांनी ‘सीविक मिरर’ला सांगितले. तज्ज्ञांनी या वर्षाच्या सुरुवातीला राज्याच्या आरोग्य मंत्रालयाला मोठा उद्रेक होण्याच्या शक्यतेबाबत इशारा दिला होता. राज्याचे माजी आरोग्य संचालक आणि संसर्गजन्य रोगांसाठीच्या राज्य टास्क फोर्सचे प्रमुख डॉ. सुभाष साळुंखे यांनी ‘सीविक मिरर’ला सांगितले की, “आम्ही या वर्षाच्या सुरुवातीला स्वाइन फ्लूचा उद्रेक होण्याचा इशारा दिला होता. मात्र त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले.”

“स्वाईन फ्लूचा प्रादुर्भाव होऊन १० वर्षांहून अधिक काळ लोटला आहे. आता या रोगाच्या विषाणूने स्थानिक वातावरणाशी स्वत:ला जुळवून घेतले आहे. आता स्वाईन फ्लूच्या विषाणूमध्ये मोठ्या प्रमाणात बदल झाल्याचे आम्हाला आढळून आले आहे. अशाप्रकारे उद्रेक होण्यास कारणीभूत असलेल्या कोणत्याही विषाणूमध्ये दरवर्षी किरकोळ उत्परिवर्तन होत असते. या बाबतीत मात्र ते लक्षणीय आहे. पावसाळ्याच्या शेवटी, हिवाळ्याच्या सुरुवातीस आणि पुढच्या वर्षीही मोठ्या संख्येने स्वाइन फ्लूची प्रकरणे नोंदवली जातील,” अशी भितीही डॉ. सुभाष साळुंखे यांनी व्यक्त केली.

सध्याच्या परिस्थितीबद्दल चिंता व्यक्त करताना डॉ. सुभाष साळुंखे पुढे म्हणाले, “दुर्दैवाची बाब म्हणजे आधी ज्यांना संसर्ग झाला होता त्यांनाही यावेळी पुन्हा संसर्ग होऊ शकतो. म्हणून, सर्व इन्फ्लूएंझासदृश आजारांची नोंद करण्यासाठी आणि सर्व डॉक्टर आणि रुग्णालयांना या रोगाची सूचना देणे आवश्यक आहे. यावर आम्ही लक्ष ठेऊन आहोत.




### राज्याला गरज असल्यास लस उपलब्ध करून देऊ : अदर पूनावाला

» या संसर्गाचा सामना करण्याचा एकमेव मार्ग असलेल्या लशींवर तज्ज्ञांनी भर दिला आहे. याबाबत ‘सीविक मिरर’ने संपर्क साधला असता, २००९-१० मध्ये स्वाईन फ्लूविरूद्ध लस तयार करून अनेकांना वाचवण्यात महत्त्वाची भूमिका बजावणारे सीरम इन्स्टिट्यूटचे मुख्य कार्यकारी अधिकारी अदर पूनावाला म्हणाले, “स्वाइन फ्लूचा सामना युद्धपातळीवर करण्यात आला होता आणि आता राज्याला गरज असेल, तर आम्ही निश्चितपणे लस उपलब्ध करून देऊ कारण आमच्याकडे फ्लूच्या लशींची प्रचंड क्षमता आहे. राज्य ते सर्वांना परवडणाऱ्या किमतीत उपलब्ध करून देऊ शकते.”

### पुण्यातील संसर्गजन्य उपचारांचे प्रमुख केंद्र रिकामे पडून

» राज्याचे माजी आरोग्य संचालक आणि संसर्गजन्य रोगांसाठीच्या राज्य टास्क फोर्सचे प्रमुख डॉ. सुभाष साळुंखे यांनी खुलासा केला की, “एकेकाळी संसर्गजन्य रोगांवरील उपचारांचे प्रमुख केंद्र असलेले पुण्यातील नायडू रुग्णालय जवळजवळ रिकामे पडले आहे. इशारे देऊनही रुग्णालये किंवा समर्पित वॉर्डांसाठी महापालिकेची कोणतीही तयारी योजना नाही. सध्याचे नायडू रुग्णालय शहराबाहेर स्थलांतरित करण्यात आले आहे, ज्यामुळे ते पोहोचण्यायोग्य नाही. संसर्गजन्य रोगांच्या प्रादुर्भावाचा सामना करण्यासाठी फक्त दुसरी सुविधा, मुंबईतील कस्तुरबा हॉस्पिटल, अपुरी आहे. त्यामुळे, संक्रमण आणि नवीन विषाणूंची वाढती संख्या लक्षात घेता, आम्ही किमान आठ संसर्गजन्य रोग रुग्णालयांची मागणी केली होती, परंतु या मागणीकडे दुर्लक्ष करण्यात आले.

### कोविडपेक्षाही गंभीर स्थिती निर्माण होण्याची भीती

» इंडियन असोसिएशन ऑफ एपिडेमियोलॉजिस्टचे राष्ट्रीय सदस्य डॉ. अमिताव बॅनर्जी यांनीही डॉ. सुभाष साळुंखे यांनी नोंदवलेल्या निरीक्षणाला दुजोरा दिला. ते म्हणाले, “स्वाईन फ्लूचा उद्रेक परत येण्याचे कारण विषाणूमध्ये प्रतिजैविक बदल झाला आहे. विषाणूचे उत्परिवर्तन होत असल्याने, स्वाईन फ्लूची प्रकरणे वाढू शकतात. संसर्गाची लक्षणे जाणवत असतील तर लोकांनी तातडीने चाचण्या करून घ्याव्या.

# चिखली-तळवडे- रुपीनगरमधील वीज समस्या सोडवण्यासाठी पुढाकार!

## आमदार महेश लांडगे यांच्या सूचनेनुसार अधिकाऱ्यांची बैठक : स्थानिक लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्त्यांनी मांडल्या व्यथा

**पुणे | प्रतिनिधी**

गेल्या आठवडाभरात झालेल्या अतिमुसळधार पाऊसामुळे ठिकठिकाणी पाणी साचले. त्यामुळे भोसरी विधानसभा मतदार संघातील चिखली, तळवडे-रुपीनगर रहिवाशी आणि औद्योगिक पट्ट्यातील वीज समस्या मोठ्या प्रमाणात उद्भवली आहे. परिणामी, सर्वसामान्य नागरिक, व्यापारी, उद्योजक आणि नोकरदार यांना नाहक मन:स्ताप सहन करावा लागला. त्यामुळे वीज समस्या सोडवण्यासाठी महावितरण प्रशासन व स्थानिक लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेतला आहे.

सर्वसामान्य नागरिकांकडून वीज समस्यांबाबत तक्रारी येत आहेत. या पार्श्वभूमीवर आमदार महेश लांडगे यांच्या सूचनेनुसार महावितरणचे अधिकारी व स्थानिक लोकप्रतिनिधी यांची एकत्रित बैठक घेण्यात आली. महानगरपालिका प्रभाग क्रमांक- १ मधील चिखली गावठाण भाग, पाटीलनगर, गणेशनगर, मोरे वस्ती, म्हात्रे वस्ती,ताम्हाणे वस्ती,, शेलार वस्ती, सोनवणे वस्ती आदी भागातील वीज समस्या सोडवण्यासाठी महावितरण प्रशासनाचे अधिकारी यांच्यासोबत चर्चा करण्यात आली.

यावेळी माजी नगरसेवक सुरेशतात्या म्हेत्रे, माजी नगरसेवक कुंदन गायकवाड, माजी स्वीकृत सदस्य दिनेश यादव, योगेश सोनवणे, अंकुश मळेकर, ऋषी मोरे, अविनाश मोरे, कामगार नेते किसन बावकर, रविंद्र राजगुरू, संतोष सुळके आदी उपस्थित होते. तसेच, महावितरणचे कार्यकारी अभियंता अतूल देवकर, उपकार्यकारी अभियंता अशोक जाधव, कनिष्ठ अभियंता शाम दिवटे यांनी वीज विषयक समस्या जाणून घेतल्या. त्यावर तातडीने उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले आहे.



### प्रलंबित कामे मार्गी लावणार...

» दरम्यान, तळवडे-रुपीनगर येथील समस्यांबाबतही बैठक घेण्यात आली. यामध्ये वीज समस्या निर्माण झालेल्या परिसरामध्ये वीज वाहिनी भूमिगत करणे आणि जुन्या ओव्हरहेड वीजवाहिन्या काढून टाकणे, जुने फिडर पिलर आवश्यक आहे तिथे बदलणे, वीज वाहिन्यांचे सर्व्हेक्षण करुन ना-दुरूस्त झालेल्या वाहिन्या बदलणे, नवीन ट्रान्स्फार्मर बसवणे, आरडीएसएस व डीपीडीसी मार्फत निधीची उपलब्धता करुन वीज विषयक प्रलंबित कामे मार्गी लावण्याचे निश्चित करण्यात आले. यावेळी माजी नगरसेवक शांताराम भालेकर, पांडुरंग भालेकर, अनिल भालेकर, संदीप जाधव, रामदास कुटे, वैभव खोडवे आदी उपस्थित होते.

> अतिमुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी वीज समस्या निर्माण झाल्या आहेत. वीज समस्या सोडवण्यासाठी नागरिकांनी ‘परिवर्तन हेल्पलाईन- 93 79 90 90 90’ वर संपर्क करावा. मी आणि माझे सहकारी वीज समस्या सोडवण्यासाठी कटिबद्ध आहोत. गेल्या आठवडाभरामध्ये सर्वसामान्य नागरिक, गृहणी, उद्योजक आणि व्यावसायिकांना वीज पुरवठा खंडीत झाल्यामुळे नाहक मन:स्ताप सहन करावा लागला आहे. त्यामुळे तातडीने दुरूस्तीचे कामे व उपाययोजना करण्याच्या सूचना महावितरण प्रशासनाला केल्या आहेत.
>
> **-महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

# शहरातील रस्त्यांवर दोन हजार खड्डे

## महापालिका स्थापत्य विभागाकडून 1580 खड्डे बुजवले असल्याचा दावा : अजूनही 423 खड्डे शिल्लक

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरासह उपनगर भागातील रस्त्यांची अक्षरशः चाळण झाली आहे. मागील पंधरा दिवसांपासून सुरू झालेल्या धुव्वाधार पावसाने रस्त्यांची अवस्था बिकट झाली आहे. यामध्ये 'रस्त्यात खड्डा आहे की खड्ड्यात रस्ता' अशी स्थिती निर्माण झाली आहे. शहरातील विविध रस्त्यांवर तब्बल २००३ खड्डे आढळून आले आहेत. त्यापैकी महापालिका स्थापत्य विभागाकडून १५८० खड्डे बुजवले असल्याचा दावा केला आहे, तर अजूनही ४२३ खड्डे शिल्लक राहिले आहेत.



शहरात पावसाचा जोर वाढला आहे. पवना, इंद्रायणी नदीकाठच्या भागात पूरपरिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे शहरासह अनेक भागात पावसाच्या पाण्याने अनेक भागात खड्डे तयार झाले आहेत. अनेक खड्ड्यांमध्ये पाणी साचून राहिल्यामुळे वाहनचालकाला खड्ड्याचा अंदाज येत नाही. वाहन खड्ड्यात आदळून चालकाला तसेच वाहनाला दणका बसत आहे. खड्ड्यांतून सुट्या झालेल्या खडीमुळे दुचाकी घसरून अपघात देखील होत आहेत. खड्ड्यांपासून बचावासाठी दुचाकी चालकांना कसरत करावी लागत आहे. परिणामी वाहतुकीचे संथ गती येत आहे. जूनअखेर पावसाला सुरुवात झाली. मागील पंधरा दिवसांपासून शहरात जोर वाढला त्यामुळे शहरातील पिंपरी, चिंचवड, निगडी, भोसरी, नवी सांगवी, जुनी सांगवी, वाकड, ताथवडे, पुनावळे, थेरगाव, चिखली, आकुर्डी परिसरातील रस्त्यांवर खड्डे पडले आहेत.

महापालिकेच्या आठही क्षेत्रीय कार्यालय हद्दीत २००३ खड्डे आढळले होते. त्यांपैकी १६३९ खड्डे १३ जुलैपर्यंत आढळून आले होते. त्यानंतर २२ जुलै अखेर ३६४ खड्डे आढळून आले आहेत. यांपैकी डांबर आणि कोल्ड मिक्सने १०११, खडीने ३५६, पेव्हिंग ब्लॉकने ६६, सिमेंट कॉंक्रिटने १४७ असे १५८० खड्डे पूर्णतः बुजविले आहेत. शहरातील केवळ ४२३ खड्डे बुजवण्याचे बाकी असल्याचा दावा महापालिका स्थापत्य विभागाने केला आहे. मात्र, तरीही शहरातील अनेक भागातील रस्त्यावर खड्डेच खड्डे दिसून येत आहेत. तसेच दरवर्षी पावसाळ्यात पडणाऱ्या खड्ड्यांबाबत लोकप्रतिनिधी आणि अधिकारी एकमेकांकडे बोट दाखवितात. ठेकेदार स्वतः नामानिराळे राहतात. रस्ते तयार करताना त्यावर खड्डे पडणारच नाहीत अशा प्रकारे दर्जेदार का बांधले जात नाहीत? रस्त्याचा आराखडा तयार करणाऱ्या अभियंत्यापासून तो बनवणाऱ्या ठेकेदारांपर्यंत सर्वांवर कारवाई करायला हवी. त्याशिवाय खड्डे पडणे बंद होणार नाही.

दरम्यान, शहरातील सर्वच भागांतील रस्त्यांवर खड्डे पडले आहेत. या खड्ड्यांमुळे अपघात होत आहेत. महापालिका स्थापत्य विभागाने पावसाळ्यापूर्वी खड्डे बुजवण्यात अपयशी ठरले आहे. प्रशासनाने तातडीने खड्डे बुजवावेत, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

> “ पावसामुळे डांबरीकरण करणे शक्य होत नाही. त्यामुळे पावसाळ्यात रस्त्यावर पडलेले खड्डे मुरुम, खडी आणि सिमेंट-कॉंक्रिटने बुजवले जातात. पावसाळा संपल्यानंतर सर्व खड्डे पुन्हा नव्याने डांबराने भरण्यात येणार आहे. उर्वरित खड्डे देखील लवकरच बुजवले जातील.
>
> **- मकरंद निकम, शहर अभियंता, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

# ‘वायसीएम' च्या अधिष्ठात्यांचा अहवाल आयुक्तांनी फेटाळला!

## पूजा खेडकरांना दिलेल्या दिव्यांग प्रमाणपत्राबाबत पुन्हा चौकशी करण्याचा आदेश

**पिंपरी | प्रतिनिधी**

भारतीय प्रशासकीय सेवेतील प्रशिक्षणार्थी अधिकारी पूजा खेडकर यांनी पिंपरी-चिंचवडमधील यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामधील (वायसीएम) शिकाऊ डॉक्टरकडून तपासणी करून अपंगत्वाचे प्रमाणपत्र दिल्याचे उघडकीस आले आहे. केंद्र शासनाच्या नियमावलीचे पालन करून सात टक्के अपंगत्वाचे प्रमाणपत्र दिल्याबाबतचा 'वायसीएम'च्या अधिष्ठात्यांचा अहवाल महापालिका आयुक्तांनी फेटाळला असून, पुन्हा चौकशी करून सुधारित अहवाल देण्याचा आदेश दिला आहे.




खेडकर यांना सात टक्के अपंगत्वाचे प्रमाणपत्र 'वायसीएम'मधून देण्यात आले होते. या रुग्णालयातील अस्थिरोग आणि फिजिओथेरपी विभागाच्या डॉक्टरांनी केंद्र शासनाच्या नियमावलीचे पालन करून प्रमाणपत्र दिल्याबाबतचा अहवाल 'वायसीएम'च्या अधिष्ठात्यांनी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे दिला होता. मात्र, हा अहवाल आयुक्तांनी फेटाळला आहे. शिकाऊ डॉक्टरांकडून तपासणी करून अपंगत्वाचे प्रमाणपत्र दिल्याचे निदर्शनास आल्याने याबाबत पुन्हा चौकशी करून सुधारित अहवाल सादर करण्याचा आदेश सिंह यांनी दिल्याचे सूत्रांनी सांगितले.

पूजा खेडकर या वेगवेगळ्या वादग्रस्त प्रकरणांमुळे अडचणीत आल्या आहेत. खेडकर यांनी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या 'वायसीएम' रुग्णालयातून अपंगत्वाचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी रहिवासी पुरावा म्हणून तळवडेतील कंपनीचा पत्ता दिला होता. प्रमाणपत्रासाठी रेशन कार्ड ओळखपत्र म्हणून दिले होते. या रेशन कार्डवरही याच कंपनीचा पत्ता आहे. तळवडे गावठाणातील जोतिबानगर येथे असलेली थर्मोव्हेरिटा प्रायव्हेट लिमिटेड ही कंपनी पूजा यांच्या आई मनोरमा यांच्या नावावर आहे. कंपनीमार्फत २००९ पासून एप्रिल २०२२ पर्यंत नियमित व्यावसायिक कर भरण्यात आला. त्यानंतर कराचा भरणा केला नाही. कंपनीकडे दोन लाख ७७ हजारांचा कर थकीत आहे. त्यामुळे महापालिकेने मार्च महिन्यात जप्तीपूर्व नोटीस दिली होती. नोटिशीनंतरही कर न भरल्याने अधिपत्र बजाविण्यात आले असून, १९ जुलै रोजी मालमत्ता जप्त केली आहे. अधिपत्र बजाविल्यानंतर २१ दिवसांच्या आत कर भरावा लागतो. या वेळेत कर न भरल्यास मालमत्तेचा लिलाव किंवा विक्री केली जाते. थकीत कर भरण्यासाठी केवळ ११ दिवसांचा कालावधी असून, या कालावधीत कर न भरल्यास खेडकर कुटुंबीयांच्या कंपनीचा लिलाव केला जाणार असल्याचे महापालिकेकडून सांगण्यात आले.

### ‘थर्मोव्हेरिटा' कंपनीचा लिलाव

**» खेडकर कुटुंबीयांशी संबंधित असलेली तळवडे येथील थर्मोव्हेरिटा प्रायव्हेट लिमिटेड कंपनी थकबाकीमुळे जप्त झाली आहे. दोन लाख ७७ हजार रुपयांची थकबाकी भरण्यास ११ दिवसांचा कालावधी असून, कर न भरल्यास कंपनीचा लिलाव करण्यात येणार असल्याचे महापालिकेकडून सांगण्यात आले.**

# पालकमंत्री नसतानाही पुण्यात धरण वाहिलं

## पुण्यातील पूरपरिस्थितीलरून मनसे अध्यक्ष राज ठाकरेंची उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर टीका



**पुणे | प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पुण्यात पावसामुळे पूरस्थिती निर्माण झालेल्या भागाची पाहणी करत नुकसानीचा आढावा घेतला. यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधत राज्य सरकारवर टीका केली. तसेच पाणी सोडताना लोकांना सांगायला हवं होतं. एवढ्या मोठ्या प्रमाणात पाणी सोडलं जाणार याची कल्पनाही लोकांना नव्हती. पुण्यातील परिस्थितीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी लक्ष घातलं पाहिजे. पुण्याचे पालकमंत्री येथे नसतानाही पुण्यात धरण वाहिलं, अशी टीका राज ठाकरे यांनी पुण्यातील पूरस्थितीवर बोलताना राज्य सरकारवर आणि अजित पवार यांच्यावर केली.

“धरणातील पाणी एवढ्या मोठ्या प्रमाणात सोडलं जाणार याची कल्पनाही लोकांना नव्हती. त्यामुळे अनेक लोकांच्या घरात पाणी शिरलं. मला वाटतं की राज्य सरकारने या सर्व गोष्टीचा विचार करायला हवा. मुंबई बरबाद व्हायला वेळ लागला. मात्र, पुणे बरबाद व्हायला वेळ लागणार नाही. गेले अनेक वर्ष हे मी सांगतो आहे त्याचच हे चित्र आहे. प्रत्येकवेळी राज्य सरकारकडून डेव्हलपमेंट प्लॅन येतो पण टाऊन प्लॅनिंग नावाची काही गोष्ट नसते”, असं राज ठाकरे यांनी म्हटलं.

राज ठाकरे पुढे म्हणाले, “शहरात किती गाड्या येत आहेत, किती विद्यार्थी येत आहेत. येणाऱ्या गाड्या पार्क कुठे होणार? लोक राहणार कुठे? या प्लॅनिंगसाठी काही उपायोजना कराव्या लागतात. मात्र, आपल्या कोणत्याही शहरात या उपायोजना राबवल्या जात नाहीत. आपल्याकडे जमीन दिसली की विकायची एवढाच उद्योग सुरु आहे. महानगरपालिकेतील काही अधिकारी आणि राज्य सरकारमधील काही अधिकारी आणि बिल्डर्स यांच्यामाध्यमातून अशी शहर बरबाद होत आहेत”, असा आरोप राज ठाकरे यांनी केला.

“आज पुणे शहर हे एक राहिलं नाही. त्याची पाच-पाच शहरं झाली आहेत. एक अधिकारी निलंबित करुन काही होत नाही. पुण्यातील परिस्थितीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनीही लक्ष घातलं पाहिजे. सध्या महाराष्ट्रात जे चालू आहे, ते अत्यंत दुर्दैवी आहे. महाराष्ट्रात फक्त मतांसाठी राजकारण सुरु आहे. पण हे महाराष्ट्रासाठी चागलं लक्षण नाही. या सर्व गोष्टीचा विचार राजकारण्यांनी केला पाहिजे. मग तुमच्यात काय मतभेत असतील किंवा काय मतदान करुन घ्यायचं असेल ते करा. पण अशा प्रकारे जाती-जातीमध्ये विष कलवून जर मतदान मिळवत असताल तर महाराष्ट्राचं भविष्य चांगलं नाही”, असं राज ठाकरे यांनी म्हटलं.

> **केंद्र सरकार महानगरपालिकांच्या निवडणुका का घेत नाही?**
>
> **» गेले दोन ते तीन वर्ष केंद्र सरकार महानगर पालिकांच्या निवडणुका घेत नाही. येथे कोणीही नगरसेवक नाही. विधानसभा निवडणुका लागतील तेव्हा आमदार येतील. मग नगरसेवक नसल्यामुळे जबाबदारी कोण घेणार? मग प्रशासनाशी कोणी बालायचं? याची सर्व जबाबदारी प्रशासनाची आहे. त्यांनीही लोकांना धीर दिला पाहिजे. बाहेरच्या राज्यातून येणाऱ्या लोकांना तुम्ही फुकटची घर देत आहात. पण या राज्यातील लोक आहेत ते भीक मागत आहेत. मग याला काय सरकार चालवणं म्हणतात का?, असा सवाल राज ठाकरे यांनी केला.**

# परदेशी शिष्यवृत्तीसाठी आता 55 टक्के गुण पुरे!

## परदेशातील पदव्युत्तर पदवी, पदविका, पीएचडी शिक्षणासाठीचे शुल्क सरकार भरणार : खर्चाची मर्यादादेखील हटवली



**पुणे | प्रतिनिधी**

बार्टी, टीआरटीआय, सारथी आणि महाज्योती आदी संस्थांकडून देण्यात येणाऱ्या परदेशी शिक्षणासाठीच्या शिष्यवृत्तीसाठी असलेली गुणांची अट राज्य सरकारने शिथिल केली आहे. विद्यार्थी, पालक, विद्यार्थी संघटनांच्या दबावानंतर सरकारने निर्णय बदलला. आता परदेशातील विद्यापीठात पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका अथवा पीएचडीच्या शिष्यवृत्तीसाठी पदवी, पदव्युत्तर पदवी परीक्षेत ५५ टक्के गुण मिळवणारे विद्यार्थी पात्र ठरणार आहेत. तसेच खर्चाची मर्यादा हटविण्यात आली असून, परदेशातील विद्यापीठाची सर्व फी राज्य सरकार करणार आहे. परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देणाऱ्या राज्य सरकारच्या संस्थांनी जून महिन्यात मागविलेल्या जाहिरातीमध्ये ७५ टक्के गुणांची अट घातली होती.

**विद्यार्थ्यांपुढे अनेक अडचणी**

जाहिरातीमुळे परदेशातील शिक्षणाचे स्वप्न बाळगून असलेल्या अनेक विद्यार्थ्यांची निराशा झाली होती. तसेच ही अट शिथिल करण्याची मागणी केली जात होती. मात्र, आता राज्य सरकारने पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका आणि पीएचडीचे शिक्षण घेण्यासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठातून अनुक्रमे पदवी आणि पदव्युत्तर पदवी परीक्षेत किमान ५५ टक्के गुण मिळविण्याची अट घातली आहे. तसेच आता विद्यार्थ्यांचे सर्व शैक्षणिक शुल्क संबंधित संस्थांकडून थेट परदेशातील विद्यापीठाच्या खात्यात जमा केले जाणार आहे. त्यातून विद्यार्थ्यांना परदेशातील विद्यापीठांतील शिक्षणाचे संपूर्ण शुल्क मिळणार आहे. परदेशातील महागाई पाहता निर्वाह भत्ता खर्चाची मर्यादा वाढवून विद्यार्थ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी यूकेतील विद्यापीठात शिकणाऱ्या सौरभ हटकर या विद्यार्थ्याने केली होती.

**फेलोशिप संख्या वाढवली**

बार्टी, सारथी आणि महाज्योती संस्थांकडून देशातील विद्यापीठांमध्ये पीएचडी करणाऱ्या विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या फेलोशिपची संख्या वाढविली आहे. या फेलोशिपसाठी एकूण विद्यार्थ्यांची संख्या २०० वरून ३०० एवढी करण्यात आली आहे. टीआरटीआयकडून आदिवासी विद्यार्थ्यांसाठी दिल्या जाणाऱ्या फेलोशिपसाठी विद्यार्थी संख्या १०० वरून २०० करण्यात आली आहे.

> **देशात पीएचडी करणाऱ्यांना दिलासा**
>
> **» अनुसूचित जाती, ओबीसी, भटके विमुक्त, एसबीसी आणि मराठा समाजातील पीएचडीच्या सरसकट सर्व विद्यार्थ्यांना फिलोशिप द्यावी, या मागणीसाठी आंदोलन केले होते. आता या विद्यार्थ्यांची मागणी सरकारने मान्य केली असून, ऑक्टोबर २०२३ पूर्वी पीएचडीच्या फिलोशिपसाठी अर्ज केलेल्या सर्व ३,५४५ पैकी पात्र विद्यार्थ्यांना सरसकट ५० टक्के फिलोशिप देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दरम्यान, सर्व पात्र विद्यार्थ्यांना फिलोशिप देण्याच्या निर्णयाचे स्वागत आहे. मात्र, सर्व विद्यार्थ्यांना १०० टक्के फिलोशिप द्यावी, अशी मागणी विद्यार्थी राजीव खोब्रागडे यांनी केली आहे.**